**नियमित दिवाणी दावा क्र.५६९/२०१७**

(लक्ष्मीबाई वगैरे वि. द्रोपदाबाई व इतर)

**CNR No.MHSO07-000715-2017**

**<u>निशाणी क्र.२५ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, याकामी आवश्यक ती कागदपत्रे त्यांना मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे व तांत्रिक कारणांमुळे त्यांना मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आले नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने त्यांचेदेखील मौलिक हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द 'विना कैफियत' आदेश पारित करण्यात आलेला आहे. सबब, त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना देखील त्यांच्या बचावाची संधी मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द न केल्यास आणि त्यांना त्यांचे कैफियत दाखल

करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. सबब, खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये ३०००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.१ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यात येत आहे व त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे. |

PRAVIN PUNDLIK BAGUL

Digitally signed by PRAVIN PUNDLIK BAGUL
Date: 2024.09.06 17:21:16 +0530

(पी. पी. बागुल)

दिनांकः– ०६.०९.२०२४

४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 06.09.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 06.09.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 06.09.2024 |